भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
वैद्यकिय आरोग्य विभाग

**प्रस्तावना:-**

विषय :- महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिक/दवाखाने यांची महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागातंर्गत निःशुल्क नोंद करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून महानगरपालिकास्तरावर महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्टेशन (सुधारीत), नियम २०२१ अन्वये महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी हॉस्पिटल, नर्सिंग होम व मॅटर्निटी होमची नोंदणी करणेत येत आहे. आतापर्यंत एकूण १५४ खाजगी हॉस्पिटल, नर्सिंग होम व मॅटर्निटी होमची नोंदणी करणेत आलेली आहे. Clinical Establishment Act शासनस्तरावर मंजुरीस्तव प्रलंबित असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिक/दवाखान्यांची नोंदणी होत नाही.

महाराष्ट्र शासनाचे वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. सीआयएस/१०१९/१७२६/प्र.क्र.३३५/९९/अधिनियम मंत्रालय, मुंबई. दि. ५ फेब्रुवारी २००३ चे शासन परिपत्रकान्वये बेकायदेशिरपणे वैद्यकिय व्यवसाय करणारे बोगस डॉक्टरांवर कारवाई करणेसाठी निर्देश प्राप्त झाले असता, या संदर्भात शासनाकडून महानगरपालिकास्तरावर पुर्नर्विलोकन समितीची स्थापना करणेत आलेली आहे व त्यानुसार सदर समितीमध्ये महानगरपालिका आयुक्त, अध्यक्ष व महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पहात आहेत.

महानगरपालिकास्तरावरील सदर पुर्नर्विलोकन समितीचे नियंत्रणाखाली महानगरपालिकेच्या १ ते १९ नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकायांमार्फत मनपा कार्यक्षेत्रामध्ये अनाधिकाराने वैद्यकिय व्यवसाय करणाया बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांचे विरूध्द महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर ॲक्ट १९६१ चे कलम ३३, ३६ अन्वये संबंधीत पोलीस स्टेशनकडे आतापर्यंत ७५ बोगस डॉक्टरांवर गुन्हे दाखल करणेत आलेले आहेत. मात्र भिवंडी मनपा कार्यक्षेत्र झोपडपट्टी बहुल भाग व दाट लोकवस्तीचे असल्यामुळे बोगस डॉक्टरांवर नियंत्रण मिळणेकामी अडथळा येत आहे. तसेच सद्यःस्थितीत अनाधिकाराने वैद्यकिय व्यवसाय करणाया बोगस डॉक्टरांचे विरूध्द तक्रारींमध्ये वाढ झालेली आहे. सबब महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये खाजगी क्लिनिक/दवाखाने यांची महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागातंर्गत नोंद केल्यास महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये नागरीकांमध्ये जनजागृती करून अथवा प्रसिध्दी देवून महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाकडे नोंद असलेल्या वैद्यकिय व्यावसायीकाकडे उपचार घेणेसाठी नागरीकांना

कळविणेत येईल. त्यामुळे अनाधिकाराने अथवा कोणत्याही पॅथीची शैक्षणिक पात्रता नसलेल्या वैद्यकिय व्यावसायीकांवर/बोगस डॉक्टरांवर नियंत्रण मिळविणे सोईचे होईल.

तसेच पर्यावरणाच्या व साथरोगाच्या दृष्टीकोनातुन केद्र शासनाचे प्रदुषण नियंत्रण महामंडळ त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ (MPCB) यांचे कायद्यानुसार/सूचनेनुसार महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद कार्यक्षेत्रातील सरकारी/खाजगी वैद्यकिय आस्थापनांमधून दैनंदिन निघणारा जैव वैद्यकिय कचरा (BMW) गोळा करणे, वाहतुक करणे व Incineration Plant मध्ये शास्त्रोक्त पध्दतीने (Scientific Disposal) विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे व महानगरपालिका/नगरपालिका आपले कार्यक्षेत्रातील शासकिय/निमशासकिय/खाजगी वैद्यकिय आस्थापनांमधून निघणारा जैव वैद्यकिय कचरा (BMW) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ (MPCB) कडून परवानगी/मान्यता असलेल्या एजन्सी/कंपनी यांना नियुक्त करून त्यांचे मार्फत सदरचा जैव वैद्यकिय कचरा (BMW) शास्त्रोक्त पध्दतीने (Scientific Disposal) विल्हेवाट लावणेची जबाबदारी प्रत्येक महानगरपालिका/नगरपालिका यांची आहे. मात्र मनपास्तरावर खाजगी क्लिनिक/दवाखान्यांची नोद होत नसल्यामुळे याबाबत नियंत्रण ठेवता येत नाही.

त्याचप्रमाणे सध्या महानगरपालिकास्तरावर महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्टेशन (सुधारीत), नियम २०२१ अन्वये महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी हॉस्पिटल, नर्सिंग होम व मॅटर्निटी होमची नोंदणी करणेत येत आहे व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिक/दवाखान्यांची नोंद केल्यास महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व खागजी वैद्यकिय व्यावसायीकांची माहिती महानगरपालिकेकडे अद्ययावत राहील व साथजन्य परिस्थिती अथवा आपत्कालीन परिस्थितीमध्ये सरकारी वैद्यकिय यंत्रणा अपुरी पडल्यास सदरच्या खाजगी वैद्यकिय व्यावसायीकांची मदत घेणे महानगरपालिकेला सोईचे होईल.

उक्त बाबींचा विचार करता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बोगस डॉक्टरांवर नियंत्रण मिळविणेसाठी, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दैनंदिन निघणारा जैव वैद्यकिय कचरा (BMW) विल्हेवाटीवर नियंत्रण ठेवणेसाठी तसेच साथजन्य/आपत्कालीन परिस्थितीमध्ये खाजगी वैद्यकिय व्यावसायीकांचे सहकार्य प्राप्त करून घेणेसाठी महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाकडे मनपा कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिक/दवाखाने यांची नोंद करणे अत्यंत आवश्यक वाटत आहे.

सद्य:स्थितीत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील क्लिनिक/दवाखान्यातील वैद्यकिय व्यावसायीक संबंधी Council व महानगरपालिकेच्या परवाना विभागाकडील परवाना शुल्क भरून परवाना प्राप्त करून वैद्यकिय व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे मनपा कार्यक्षेत्रातील क्लिनिक/दवाखान्यांची नोंद नि:शुल्क करणे आवश्यक वाटते.

सबब महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिक/दवाखान्यांची नोंद संबंधीत डॉक्टरच्या शैक्षणिक पात्रतेच्या व अन्य आवश्यक कागदपत्रांच्या आधारे करण्यात येईल. तसेच महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वैद्यकिय व्यावसायीक पात्राता धारण केलेल्या पॅथीच्या प्रॅक्टीस न करता अन्य पॅथीची प्रॅक्टीस

करत असल्याबाबत अलिकडच्या काळामध्ये काही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे पात्रता धारण केलेल्या पॅथीची प्रॅक्टीस करणेसाठी वैद्यकिय व्यावसायीकांचा क्लिनिक/दवाखान्यांची नोंद करतेवेळी शपथपत्र घेणेत येईल व त्यामुळे पात्रता धारण केलेल्या पॅथीची प्रॅक्टीस करणेसाठी वैद्यकिय व्यावसायीकांवर याबाबत निर्बंध ठेवता येईल.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिक/दवाखाने नोंदीकरीता अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्र जोडणेसाठी निश्चित करणेत आलेले आहेत व खालील नमुद बाब क्र. ०६ व ०७ नुसार महानगरपालिकेच्या परवाना शुल्कामध्ये वाढ होईल. तसेच महानगरपालिकेच्या घरपट्टी वसूलीमध्ये सहाय्यकारी होईल. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

१) विहित नमुन्यात अर्ज

२) संबंधीत डॉक्टरचे पदवी/पदवीत्तर प्रमाणपत्र तसेच संबंधीत Council कडील नोंदणी प्रमाणपत्र

३) १०० चे स्टॅम्प पेपरवर पात्रता धारण केलेल्या पॅथीची प्रॅक्टिस करणेबाबत प्रतिज्ञापत्र

४) जागा मालकाची NOC/Decleration/Affidavit

५) दैनंदिन निर्माण होणारा जैव वैद्यकिय कचरा (Bio-Medical Waste) विल्हेवाट करणाया अधिकृत एजन्सिचे प्रमाणपत्र

६) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अंतर्गत महानगरपालिकेचा परवाना प्रमाणपत्र

७) चालु आर्थिक वर्षाची घरपट्टी पावती

८) आधारकार्ड

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिक/दवाखान्याची महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागामध्ये दि. ३१/०३/२०२५ पर्यंत नोंदणी करणेत येणार असून मुदतीत नोंदणी न करणाया खाजगी क्लिनिक/दवाखान्याला अनधिकृत संस्था म्हणून घोषित करण्यात व सदर क्लिनिक/दवाखान्यावर महानगरपालिकेकडून कारवाई करण्यास त्याचप्रमाणे खालील प्रमाणे शास्त्री आकारणीबाबत प्रस्तावित करणेत येत आहे.

१) दिनांक ०१/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ या कालावधीकरीता रू. १०००/ शास्ती

२) दिनांक ०१/०५/२०२५ ते ३१/०५/२०२५ या कालावधीकरीता रू. ५०००/ शास्ती

३) दिनांक ०१/०६/२०२५ ते ३०/०६/२०२५ या कालावधीकरीता रू. १००००/ शास्ती

तरी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बोगस डॉक्टरांवर नियंत्रण मिळविणेसाठी, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दैनंदिन निघणारा जैव वैद्यकिय कचरा (BMW) विल्हेवाटीवर नियंत्रण ठेवणेसाठी तसेच साथजन्य/आपत्कालीन परिस्थितीमध्ये खाजगी वैद्यकिय व्यावसायीकांचे सहकार्य प्राप्त करून घेणेसाठी महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाकडे मनपा कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिक/दवाखाने यांची

निःशुल्क नोंद करणेकामी तसेच खाजगी क्लिनिक/दवाखान नोंद करीता उक्त कागपत्र व शास्ती लावणेकरीता उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त सो., यांनी पूर्व मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार प्रशासकिय मान्यता मिळणेकामी प्रस्तावना सादर करणेत येत आहे.

ठराव क्र.:-- ७३९

दिनांक :- २८/०९/२०२४

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बोगस डॉक्टरांवर नियंत्रण मिळविणेसाठी, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दैनंदिन निघणारा जैव वैद्यकिय कचरा (BMW) विल्हेवाटीवर नियंत्रण ठेवणेसाठी तसेच साथजन्य/आपत्कालीन परिस्थितीमध्ये खाजगी वैद्यकिय व्यावसायीकांचे सहकार्य प्राप्त करून घेणेसाठी महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाकडे मनपा कार्यक्षेत्रातील खाजगी क्लिनिक/दवाखाने यांची निःशुल्क नोंद करणेसाठी सध्या स्थायी समिती अस्तित्वात नसल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका